28 APR 2023
तरुण भारत
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# स्वातंत्र्य सैनिकांची कहाणी...शिववाणी

आझादी का अमृत महोत्सव



**अभिवादन स्वातंत्र्यसैनिकांना!**

संजीव खाडे
कोल्हापूर

स्वातंत्र्याच्या वेदीवर आपल्या प्राणांची आहुती देणाऱ्या, स्वातंत्र्य लढ्यात जुलमी इंग्रजी सत्तेच्या विरोधात आपल्या घरावर तुळशीपत्र ठेवून लढणाऱ्या, अनन्वीत अत्याचार, मरणयातना सोसणाऱ्या, तुरूंगवास भोगणाऱ्या ज्ञात, अज्ञात अशा स्वातंत्र्यसैनिकांची काळाच्या उदरात हरवत चाललेली कहाणी सांगण्याचे पवित्र कार्य गेली ८ महिने शिवाजी विद्यापीठ करत आहे. आपला देश स्वातंत्र्याचा अमृतमहोत्सव साजरा करत असताना शिवाजी विद्यापीठाने 'अभिवादन स्वातंत्र्यसैनिकांना...'' या ध्वनी मालिकेच्या माध्यमातुन आपल्या 'शिववाणी'' वाहिनीवरून अडीचशेहून अधिक स्वातंत्र्यसैनिकांची ओळख, त्यांचा स्वातंत्र्यलढ्यातील सहभाग, योगदान आणि त्याग याबद्दलची सचित्र माहिती दिली आहे. येत्या १५ ऑगष्टपर्यंत हा देशभक्तीचा उपक्रम सुरू राहणार आहे. शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या संकल्पनेतून आकारास आलेला हा उपक्रम राज्यातील नव्हे तर देशातील एकमेव असावा. इतिहासाचे प्राध्यापक, विद्यार्थी यांच्या माध्यमातून प्रकल्प म्हणून हा उपक्रम साकारत शिवाजी विद्यापीठाने वेगळा शैक्षणिक पायंडाही या निमित्ताने पाडला आहे.

आपल्या देशात स्वातंत्र्याच्या अमृतमहोत्सवानिमित्त विविध उपक्रमांचे, कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. ते सुरू देखील आहेत. गतवर्षी ऑगष्ट २०२२ मध्ये कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांना बेळगावमध्ये देशभरातील स्वातंत्र्यसैनिकांची माहिती देणारे प्रदर्शन पाहिल्यानंतर कोल्हापूरला परतत असताना एक कल्पना सुचली. आपल्या शिवाजी विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रातील जे जिल्हा, भाग आहे, त्यातील खेड्या-पाड्यातील ज्ञात, अज्ञात स्वातंत्र्यसैनिकांची माहिती दिली तर ती जास्त प्रभावी ठरेल. कुलगुरू डॉ. शिर्के यांनी ही कल्पना संकल्पना म्हणून पुढे आणण्याचे ठरविले. आपले सहकारी प्र कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, इतिहास विभागाचे प्रमुख डॉ. अवनिश पाटील यांच्यासह जनसंपर्क अधिकारी तथा इतिहास अभ्यासक डॉ. अलोक जत्राटकर यांच्याशी चर्चा केली आहे. एक प्रकल्प म्हणून हा उपक्रम पार पाडण्याचे निश्चित करण्यात

- **शिवाजी विद्यापीठाच्या 'अभिवादन स्वातंत्र्यसैनिकांना'' ध्वनी मालिकेला उदंड प्रतिसाद**
- **कोल्हापूर, सांगली, सातारा, सिमाभागातील ज्ञात, अज्ञात स्वातंत्र्यसैनिकांची सचित्र माहिती**
- **स्वातंत्र्याच्या अमृतमहोत्सवी वर्षात उपक्रम : २५६ भाग प्रसारीत**

**तरुण भारत** संवाद
**विशेष वृत्त**

आले. कोल्हापूर जिल्ह्यासह सांगली, सातारा, सोलापूर, सिंधुदुर्ग या जिल्ह्यांसह सिमाभागातील बेळगाव, संकेश्वर, निपाणी, चिकोडी या भागातील ज्ञात, अज्ञान स्वातंत्र्यसैनिकांची माहिती संकलित करणे आणि ती शिववाणी या शिवाजी विद्यापीठाच्या अधिकृत वाहिनीवरून ध्वनी मालिकेच्या रूपात प्रसारीत करण्याचा निर्णय झाला. संपूर्ण माहिती संकलनाची जबाबदारी इतिहास विभागाचे प्रमुख डॉ. अवनिश पाटील आणि त्यांचे सहकारी डॉ. दतात्रय मचाले यांच्याकडे सोपविण्यात आली. या दोघांनी विद्यापीठ कार्यक्षेत्रासह इतर भागातील इतिहासाचे प्राध्यापक, विद्यार्थी यांच्याकडे प्रकल्प म्हणून माहिती संकलन, छायाचित्र संकलनाची जबाबदारी दिली. संकलित करून आलेली माहिती ऑडिओ फॉर्म, टेक्स्ट फॉर्ममध्ये रूपांतरीत करणे. अधिकृतता तपासणे हे काम डॉ. अलोक जत्राटकर यांनी केले. त्यांना मल्हार जोशी, विनायक ठोंबरे यांनी सहकार्य केले. त्यानंतर प्रत्यक्षात पाच ते दहा मिनिटांच्या ध्वनी मालिकेतील भागात माहिती वाचन (ऑडिओ) करण्याची जबाबदारी पीएचडीच्या अभ्यासक सुश्मिता खुटाळे यांच्याकडे सोपविण्यात आली. या सर्वांच्या सहकार्यातून 'अभिवादन स्वातंत्र्यसैनिकांना'' ही ध्वनी मालिका आकारास आली.

१५ ऑगस्ट २०२२ पासून दररोज सकाळी ९ वाजता या मालिकेतील एक भाग शिववाणी वाहिनीवरून प्रसारीत होऊ लागला. ५ ते १० मिनिटांच्या एका भागात संबंधित स्वातंत्र्यसैनिकांची संपूर्ण माहिती देण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. त्यामध्ये काही ज्ञान, अज्ञात स्वातंत्र्यसैनिकांची दुर्मीळ छायाचित्रेही दाखविण्यात आली आहेत. आता पर्यंत या मालिकेत २७ एप्रिल २०२३ पर्यंत २५६ भाग प्रसारीत झाले आहेत.

**मालिकेतील काही ज्ञात-अज्ञात स्वातंत्र्यसैनिक**

क्रांतीसिंह नाना पाटील, कर्मवीर भाऊराव पाटील,जी. डी. बापू लाड, नागनाथअण्णा नायकवडी, वसंतदादा पाटील, किसन वीर, शंकरराव माने, इंदूताई पाटणकर, जयाबाई हवेरी, तात्यासाहेब कोरे, मल्लाप्पा शेटे, पद्मताई हरोलीकर, बळवंत जबडे, दत्तोबा तांबट, बरडे गुरूजी, करवीराप्पा स्वामी, नारायण वारके, मल्लाप्पा चौगुले, शंकरराव इंगळे, तुकाराम भारमल, परशुराम साळुंखे.दत्ताजीराव जाधव (सैनिक टाकळी),बाळू बाबू रणमल्ली (हेरवाड, शिरोळ), श्रीपाल रंगाप्पा होसकल्ले (आकिवाट, शिरोळ), ईश्वर भरमाण्णा कोरी (कुदनूर, चंदगड), दुंडाप्पा हणमंत पाटील (चिंचणे, चंदगड), शंकर राऊ सासणे (शिरढोण, शिरोळ), रामचंद्र कल्लाप्पा झेले (चंदूर), माधवराव बागल (कोल्हापूर), रत्नाप्पाण्णा कुंभार (निमशिरगाव), महादेव बाळाजी मोहिते (वडगाव), बसवंत सुबराव चिगरी (चिंचणे), हसन बाबाजी अत्तार, आनंदराव तुकाराम चव्हाण, रामू आपय्या कोळी (जाधव), रामू भुजिंगा नांगरे, यशवंत गोविंद यादव, यशवंत गोविंद यादव (सर्व नूल, गडहिंग्लज)



देशातील सर्व विद्यापीठांनी त्यांच्या कार्यक्षेत्रातील स्वातंत्र्यसैनिकांची माहिती संकलित करून प्रसारीत केली, तर स्वातंत्र्य लढ्यातील हजारो ज्ञात अज्ञात स्वातंत्र्यसैनिकांची माहिती मिळणे सुलभ होईल. आमच्या शिववाणीवरील 'अभिवादन स्वातंत्र्यसैनिकांना...''या ध्वनी मालिकेला उदंड प्रतिसाद लाभत आहे. नजिकच्या काळात या मालिकेचे शब्दरूपातील पुस्तक तयार करण्यात येईल. ते शिवाजी विद्यापीठाच्या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात येईल.

**-डॉ. डी. टी. शिर्के, कुलगुरू, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर**

**मालिका साकारण्यामागे 'तरुण भारत'ची प्रेरणा**

'तरुण भारत''चे समूह प्रमुख सल्लागार संपादक किरण ठाकुर यांनी बेळगाव आरपीडी कॉलेजमध्ये देशातील स्वातंत्र्यसैनिकांची माहिती देणारे प्रदर्शन भरविले होते. त्याच्या उद्घाटनासाठी कुलगुरु डॉ. शिर्के बेळगावला गेले होते. ते प्रदर्शन पाहून त्यांना शिवाजी विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रातील जिल्ह्यातील स्वातंत्र्यसैनिकांची माहिती देण्याची कल्पना सुचली. त्यातून 'अभिवादन स्वातंत्र्यसैनिकांना...' ही मालिका आकारास आली. या मालिकेच्या निर्मितीत तरुण भारत आणि किरण ठाकुर यांची प्रेरणा असल्याचे कुलगुरू डॉ. शिर्के यांनी आदरपूर्वक नमूद केले.

28 APR 2023
लोकमत
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

### शिवाजी विद्यापीठातील संशोधकांच्या संशोधनास यश

# वनस्पतींमधील तेलाचे प्रमाण मोजण्याच्या उपकरणास पेटंट

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** सुगंधी वनस्पतींमधील तेलाचे प्रमाण मोजण्यासाठी विशेष पोर्टेबल उपकरणाची निर्मिती करण्यामध्ये शिवाजी विद्यापीठाच्या संशोधकांना यश आले असून या संशोधनास भारतीय पेटंट प्राप्त झाले आहे. तत्कालीन प्राध्यापक व डॉ. होमी भाभा समूह विद्यापीठाचे विद्यमान कुलगुरू डॉ. रजनीश कामत यांच्यासह सहा. प्रा. डॉ. तुकाराम डोंगळे, डॉ.गणेश निगवेकर, डॉ. क्रांतिवीर मोरे आणि डॉ. मानसिंगराज निंबाळकर यांचा या संशोधन चमूमध्ये समावेश आहे.

या उपकरणामध्ये तेलाचे प्रमाण मोजण्यासाठी अस्थिर सेंद्रिय संयुगे सेन्सर वापरला आहे. सेन्सरचे आउटपुट मायक्रो-कंट्रोलरद्वारे दिले जाते, तेव्हा सॅम्पलमधील तेलाचे प्रमाण दर्शविले जाते. सुगंधी वनस्पतींच्या लागवडीमधून होणारा नफा हा त्या वनस्पतीमधील तेलाच्या प्रमाणावर अवलंबून असतो. परंतु वनस्पतीमध्ये तेल योग्य प्रमाणात तयार झाले आहे की नाही, हे ओळखण्यासाठी उपलब्ध असणाऱ्या पद्धती अत्यंत खर्चिक व वेळखाऊ असल्याने तसेच त्या शेतकऱ्यांना उपलब्ध नसल्याने त्यांच्याकडून चुकीच्या वेळी पिकाची कापणी केली जाते आणि त्यामुळे त्यांना प्रचंड नुकसान सोसावे लागते. आता शिवाजी विद्यापीठाच्या या अभिनव संशोधनामुळे थेट शेतामध्ये जाऊन या उपकरणाच्या साहाय्याने पिकामध्ये तेलाचे प्रमाण किती आहे, याचा अंदाज बांधता येणे शक्य आहे.



पेटंट मिळालेले उपकरण







डॉ. रजनीश कामत डॉ. गणेश निगवेकर डॉ. क्रांतिवीर मोरे डॉ. मानसिंगराज निंबाळकर डॉ. तुकाराम डोंगळे

> संशोधक चमूने सुगंधी वनस्पतींमधील तेलाची चाचणी करण्यासाठी विकसित केलेले पोर्टेबल उपकरण हा एक अत्यंत महत्त्वाचा शोध असून शेतकऱ्यांसाठी वरदान ठरणार आहे. शेतात जाऊन तेथील वनस्पतीमधील तेलाचे प्रमाण मोजणे शक्य होणार आहे.
>
> \- डॉ. दिगंबर शिर्के
> कुलगुरू, शिवाजी विद्यापीठ.

या सर्वांना कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील व प्रभारी कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांचे मार्गदर्शन व सहकार्य लाभले.

पुण्यनगरी

# विद्यापीठात 'मोबाईल जर्नालिझम' कार्यशाळा

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील जर्नालिझम आणि मास कम्युनिकेशन विभागाच्या वतीने मोबाईल जर्नालिझम या विषयावर एकदिवसीय कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. यामध्ये डिजिटल पत्रकारिता आणि मोबाईलचा वापर या विषयावर मोहसीन मुल्ला, शेखर पाटील, दूर्वा दळवी यांनी मार्गदर्शन केले. यावेळी मुल्ला यांनी मोबाईल पत्रकारितेची तत्त्वे, मोबाईल पत्रकारितेत व्हिज्युअल व्हेरिएशन कसे असावे याबद्दल मार्गदर्शन केले. पाटील यांनी मोजो पत्रकारितेतील विविध सेगमेंट सांगून यात करिअरच्या मोठ्या संधी उपलब्ध असल्याचे सांगितले. दळवी यांनी टेलिव्हिजन बातमीदारीसाठी मोबाईलचा वापर कशा पद्धतीने करावा, यावर मार्गदर्शन केले. प्रास्ताविक विभागप्रमुख प्रा. डॉ. निशा पवार यांनी केले. पाहुण्यांची ओळख डॉ. सुमेधा साळुंखे यांनी करून दिली. आभार प्रा. परशुराम पवार यांनी मानले.

लोकमत

# शिवाजी विद्यापीठात मोबाइल जर्नालिझम कार्यशाळा उत्साहात

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील जर्नालिझम आणि मास कम्युनिकेशन विभागातर्फे गुरुवारी मोबाइल जर्नालिझम या विषयावर आयोजित एक दिवसीय कार्यशाळा उत्साहात पार पडली.

कार्यशाळेत 'डिजिटल पत्रकारिता आणि मोबाइलचा वापर' या विषयावर मोहसीन मुल्ला, 'न्यूज पोर्टलसाठी मोबाइल जर्नालिझम' या विषयावर शेखर पाटील आणि कार्यशाळेच्या अखेरच्या सत्रात 'लोकमत ऑनलाइन'च्या बातमीदार दुर्वा दळवी यांनी टेलिव्हिजन बातमीदारांसाठी मोबाइलचा वापर कशा पद्धतीने करावा, याविषयी मार्गदर्शन केले. विभागप्रमुख प्रा.डॉ. निशा पवार यांनी प्रास्ताविक केले. डॉ. सुमेधा साळुंखे यांनी ओळख करून दिली. प्रा. परशुराम पवार यांनी आभार मानले. विभागातील विद्यार्थी उपस्थित होते.

तरूण भारत

# शिवाजी विद्यापीठात डिजीटल कार्यशाळा उत्साहात

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील जर्नालिझम, मास कम्युनिकेशन विभागात गुरूवारी मोबाईल जर्नालिझमवर कार्यशाळा झाली. कार्यशाळेत सोशल मीडिया, न्यूज पोर्टल, करिअरच्या संधी यावर मार्गदर्शन करण्यात आले. विभागप्रमुख डॉ. निशा पवार मुडे यांनी स्वागत केले. डॉ. सुमेधा साळुंखे यांनी प्रास्ताविक केले. प्रा. परशराम पवार यांनी आभार मानले.

पुढारी

# शिवाजी विद्यापीठाच्या 'आरपीई' परीक्षेस १२२८ विद्यार्थी उपस्थित

कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा

शिवाजी विद्यापीठाच्या वतीने आयोजित रिसर्च अँड पब्लिकेशन इथिक्कस (आरपीई) परीक्षेला १३१५ पैकी १२२८ विद्यार्थी परीक्षेला बसले. ८७ विद्यार्थी गैरहजर राहिले. उपस्थिती ९३.३८ टक्के होती.

विद्यापीठ अनुदान आयोगाच्या निर्देशानुसार संशोधक विद्यार्थ्यांना कायम नावनोंदणी पत्र देण्यापूर्वी त्यांनी रिसर्च अँड पब्लिकेशन इथिक्कस परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक आहे. ही परीक्षा पीएच.डी. साठी आवश्यक आहे. त्याकरिता शैक्षणिक वर्ष २०२०-२१, २०२१-२२ व २०२२-२३ मधील एप्रिल-२०२३ मध्ये होणाऱ्या परीक्षेकरिता ही परीक्षा २७ एप्रिल रोजी दुपारी १२ ते १ यावेळेत विद्यापीठामध्ये चार केंद्रांमध्ये सुरळीतपणे पार पडली, अशी माहिती परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांनी दिली.

सकाळ

# १२२८ संशोधक विद्यार्थ्यांनी दिली विद्यापीठात 'आरपीई'

## यूजीसीच्या निर्देशानुसार परीक्षा; ८७ जण गैरहजर

**सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. २७ : शिवाजी विद्यापीठात संशोधन आणि प्रकाशने नैतिकता (रिसर्च अँड पब्लिकेशन इथिक्स (आरपीई) परीक्षा गुरूवारी विविध अभ्यासक्रमांच्या १२२८ संशोधक विद्यार्थ्यांनी दिली. ८७ जण गैरहजर राहिले. विद्यापीठ अनुदान आयोगाच्या (युजीसी) निर्देशानुसार परीक्षा घेण्यात आली.

विद्यापीठातील मानव्यशास्त्र इमारत, तंत्रज्ञान अधिविभाग, ग्रंथालय अभ्यास केंद्र आणि रसायनशास्त्र विभाग येथील केंद्रांवर दुपारी १२ ते १ यावेळेत परीक्षा घेण्यात आली. वस्तुनिष्ठ बहुपर्यायी (एमसीक्यू) ऑफलाईन स्वरूपात परीक्षा घेतली. या परीक्षेत ३० प्रश्नांसाठी प्रत्येक एक गुण होता. या परीक्षेसाठी एकूण १३१५ संशोधक विद्यार्थ्यांनी नोंदणी केली होती. त्यापैकी १२२८ जणांनी परीक्षा दिली. त्यात मराठी, हिंदी, इंग्रजी, मायक्रोबायोलॉजी, गणित, रसायनशास्त्र, अर्थशास्त्र, वनस्पतीशास्त्र, आदी ४० अभ्यासक्रमांच्या संशोधक विद्यार्थ्यांचा समावेश होता.

दरम्यान, २०२०-२१, २०२१-२२ आणि २०२२-२३ यावर्षातील संशोधक विद्यार्थ्यांची 'आरपीई' परीक्षा घेण्यात आल्याचे परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांनी सांगितले. युजीसीच्या निर्देशानुसार संशोधक विद्यार्थ्यांनी पीएच.डी. अभ्यासक्रमाच्या नोंदणीसाठी कायम नावनोंदणी पत्र देण्यापूर्वी त्यांनी 'आरपीई' परीक्षा देणे आवश्यक आहे.

तरुण भारत

# विद्यापीठात १२२८ विद्यार्थ्यांनी संशोधनासाठी दिली प्रवेश परीक्षा

कोल्हापूर: शिवाजी विद्यापीठात गुरूवारी संशोधक विद्यार्थ्यांसाठी प्रवेश पात्रता घेण्यात आली. यामध्ये १ हजार २२८ विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली. तर ८७ विद्यार्थी गैरहजर राहिल्याची माहिती परीक्षा मंडळाच्यावतीने देण्यात आली. विद्यापीठ अनुदान आयोगाच्या निर्देशानुसार संशोधक विद्यार्थ्यांना कायम नाव नोंदणीसाठी रिसर्च अँड पब्लिकेशन इथीक्स आरपीई परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक आहे. गुरुवारी विद्यापीठातील चार केंद्रांमध्ये दुपारी १२ ते १ या वेळेत ही पात्रता परीक्षा घेण्यात आली. मानव्यशास्त्र विभागातील ३६८ विद्यार्थ्यांपैकी ३५८ विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली. १० विद्यार्थी गैरहजर राहिले. तंत्रज्ञान विभागात ३७९ विद्यार्थ्यांपैकी ३२५ विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली. ५४ विद्यार्थी गैरहजर राहिले. लायब्ररी सायन्स विभागात ३६२ विद्यार्थ्यांपैकी ३५४ विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली. केमिस्ट्री विभागात २०६ पैकी १८९ विद्यार्थ्यांनी पात्रता परीक्षा दिली. एकूण १३१५ विद्यार्थ्यांपैकी १२२८ विद्यार्थ्यांनी पात्रता परीक्षा दिली. तर ८७ विद्यार्थी गैरहजर राहिल्याची माहिती परीक्षा व मुल्यमापन मंडळाच्यावतीने देण्यात आली.

पुढारी

# विद्यापीठातर्फे हिवाळी सत्राच्या ५२५ परीक्षांचे निकाल घोषित

कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा

शिवाजी विद्यापीठातर्फे घेण्यात आलेल्या ऑक्टोबर-नोव्हेंबर हिवाळी सत्रातील पदवी, पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या आजअखेर सुमारे ५२५ अभ्यासक्रमांचे निकाल घोषित करण्यात आले आहेत.

विद्यापीठाच्या हिवाळी सत्र परीक्षा २ जानेवारीपासून व्यवस्थितपणे सुरू आहेत. गुरुवारी बॅचलर ऑफ सायन्स, मास्टर ऑफ आर्टस् या अभ्यासक्रमाच्या परीक्षा वर्णनात्मक पद्धतीने संलग्न महाविद्यालये व अधिविभागामध्ये सुरळीतपणे झाल्या. दरम्यान २७ एप्रिल रोजी डीआयटी, कॉमर्स, एमसीए सत्र १ ते ४ अभ्यासक्रमांचे निकाल घोषित झाले.

तरूण भारत

# शिवाजी विद्यापीठातील ३ परीक्षांचे निकाल घोषित

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठात हिवाळी सत्रातील पदवी, पदव्युत्तर अभ्यासक्रमांतर्गत गुरूवारी बॅचरल ऑफ सायन्स, मास्टर ऑफ आर्टस् याच्या परीक्षा ऑफलाईन घेण्यात आल्या. गुरूवारी डी.आय.टी. कॉमर्स सेमिस्टर १, एम.सी.ए. कॉमर्स सेमिस्टर ३ आणि एम.सी.ए. सेमिस्टर ४ च्या अभ्यासक्रमांचे निकाल घोषित झाले. आजपर्यत ५२५ अभ्यासक्रमांचे निकाल घोषित झाल्याची माहिती परीक्षा, मुल्यमापन मंडळाने दिली.